MAI HU NA

Let's create a better world

प्रति
बाळासाहेब राक्षे
शिक्षणाधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे

आदरणीय साहेब
संदर्भ:

1. ठाणे महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. 15, लक्ष्मी चिराग नगर, ठाणे - 400606 ( "यापुढे "शाळा" म्हणून संदर्भित ) येथे आहे.

आमचा दिनांक 16/12/2022 चा अर्ज तुम्हाला **आवक क्रमांक 4569/22** दिनांक **16/12/2022** द्वारे सादर केला
आहे.
19/05/2023 रोजी माननीय अतिरिक्त आयुक्तांची मान्यता (2)
तुमचे निर्देश बेअरिंग क्र. T.M.C./Education/540123 दिनांक 23/05/2023

**विषय : शाळा दत्तक कार्यक्रमाच्या प्रथम ६ महिन्यांच्या कालावधीत आम्ही हाती घेतलेले उपक्रम व त्याची झालेली पूर्तता यांचा अहवाल तुम्हाला सादर करत आहोत.**

**उपक्रम क्र. १ : शैक्षणिक साहित्य , दप्तर व रेनकोट वाटप.**

जशी शाळा सुरु होते. पहिला प्रश्न मुलांच्या मनात येतो तो म्हणजे आम्हाला शाळेत भिजत तर जायला लागणार नाही
ना किंवा पावसामुळे शाळेचा खाडा तर होणार नाहीना. या द्रुष्टीने विचार करुन मैं हू ना चॅरिटेबल ट्रस्ट ने असे ठरवले
की विद्यार्थ्यांना सर्वप्रथम रेनकोट उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्याच बरोबर **दप्तर** व इतर शैक्षणिक साहित्य
( प्रत्येकी ६ वह्या,पेन,पेन्सिल,खोडरबर, टोकयंत्र,पट्टी, रंगपेटी , पाऊच इत्यादी ) याही तितक्याच गरजेच्यावस्तू शाळा सुरु  होताना विद्यार्थ्यांकडे असणे योग्य वाटले. या
कारणास्तव आम्ही आमच्या या उपक्रमात प्रथम हेच शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचा आम्ही निर्णय घेतला व **दि. १९ जुन २०२३** रोजी हा साहित्य वाटपाचा कार्यक्रम पार पडला.


शपथ
जन-गण-मन अधिनायक जय हे.
भारत-भाग्य विधाता।
पंजाब-सिंध-गुजरात-मराठा-
उच्छल-जलधि तरंग




विंध्य-हिमाचल-यमुना-गंगा
उच्छल-जलधि तरंग,
तव शुभ नामे जागे,
तव शुभ आशिष मागे
गाहे तव जय गाथा।
जन-गण-मंगलदायक जय हे
भारत-भाग्य विधाता।


शपथ
जन-गण-मन अधिनायक जय हे.
भारत-भाग्य विधाता।
पंजाब-सिंध-गुजरात-मराठा-
उच्छल-जलधि तरंग,


CHARITABLE TRUST


शपथ
राष्ट्रगीत
पसायदान
जन-गण-मन अधिनायक जय हे,
भारत-भाग्य विधाता।

## उपक्रम क्र. २ प्रथमोपचार पेटी व सॅनिटरी नॅपकिंग वेंडिंग मशीन यांचे वाटप.


शाळा सुरु झाल्यावर असे लक्षात आले कि विद्यार्थ्यांना ( मुले / मुली ) शारीरिक स्वास्थ्य तसेच स्वच्छता घटक या गोष्टींची अत्यंत गरज आहे. या अनुशंघाने आम्ही विद्यार्थ्यांसाठी शाळेमध्ये प्रथमोपचार पेटी (सर्व विद्यार्थ्यांसाठी) व सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन ( विद्यार्थीनींसाठी) बसवण्याचा निर्णय घेतला व **दि. १९ जुलै २०२३** रोजी या वस्तू शाळेमध्ये लावण्याचा कार्यक्रम
योग्य रित्या पार पडला.











## उपक्रम क्र. ३ भव्य चित्रकला स्पर्धा आयोजन व पारितोषिक वितरण सोहळा.

विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव मिळावा आणि देशाचा ७७वास्वातंत्र्यदिन या द्रुष्टीने विचार करून आमचे विश्वस्त (ट्रस्टी) श्री. देबराज भांजा सर व शाळेचे मुख्याध्यापक श्री अंकुश लांघी सर यांच्या मार्गदर्षनाखाली एक भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन नक्की केले.
या कार्यास पुढे घेऊन जाण्यासाठी मै हु ना चॅरिटेबल ट्रस्ट चे मुख्य विश्वस्त (ट्रस्टी) श्री प्रशांत मोकाशी सर यांनी एक तुकडी निर्माण केली. या तुकडी मध्ये मै हू ना चे विश्वस्त श्री अमर दिघे सर व सोनाली सातघरे मॅडम व श्री रोहन सिमन्स सर व इतर सहाय्यक यांनी पुढाकार घेतला तसेच या स्पर्धेसाठी व त्यांनंतरच्या पारितोषिक वितरण सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या गटप्रमुख सौ. अनघा पालांडे मॅडम यांना आमंत्रित करण्यात आले व हा उपक्रम **दि. १४ ऑगस्ट २०२३** रोजी भव्य आणि यशस्वी रित्या पार पडला.











## उपक्रम क्र. ४ शाळेत नवीन वॉटर कूलर आणिवॉटर प्युरिफायर लावणे


शाळेत तसेच शाळेच्या आजूबाजूच्या परिसरात अशुध्द पाणी व अशुद्ध पाण्यामुळे होणारे भयानक आजार आणि ठाणे शहरात वेळोवेळी होणारी व वाढती पाणी टंचाई पाहता मै हू ना संस्थेने शाळेच्या आवारात नवीन पद्धतीचे ऑटोमॅटिक वॉटर प्युरिफायर आणि वॉटर कुलर लावण्याचा निर्णय घेतला जेणेकरून शालेय विद्यार्थ्यांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल होऊ नये तसेच त्यांना पिण्याचे स्वछ व थंड पाणी मिळावे व त्यांना पाण्यामुळे कोणतेही आजार होऊ नयेत आणि यासाठी **दि. २४ ऑगस्ट २०२३** रोजी मै हू ना संस्थेने शाळेमध्ये २ नवीन पद्धतीचे पूर्ण ऑटोमॅटिक वॉटर कूलर आणि वॉटर प्युरिफायर बसविले.







## उपक्रम क्र . ५ शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शक व सराव पुस्तिकांचे वाटप

चित्रकला स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात जेव्हा सौ अनघा पलांडे मॅडम जेव्हा भाषण करत होत्या त्यावेळी त्या भाषणात म्हणाल्या कि असे खूप सारे विद्यार्थी आहे जे शिष्यवृत्ती परीक्षेचा अभ्यास करत आहेत ( इयत्ता पाचवी आणि आठवी ) परंतु त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे त्यांना शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शक व सराव पुस्तिका खरेदी करता येत नाही याची त्यांना खंत वाटते तसेच त्यांनी यासाठी मै हू ना संस्थेला मदतीची साद घातली व त्यावेळी आमच्या संस्थेचे मुख्य विश्वस्त श्री प्रशांत मोकाशी सर यांनी लगेच या गोष्टीला दुजोरा देत शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शक व सराव पुस्तिका खरेदीचा निर्णय घेतला आणि **दि. ४ सप्टेंबर २०२३** रोजी शिष्यवृत्ती परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांना ( इयत्ता पाचवी आणि आठवी ) शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शक व सराव पुस्तिकांचे वाटप करण्यात आले.






## उपक्रम क्र . ६ शाळेसाठी स्वच्छता साहित्य वाटप

शाळेमध्ये स्वछता असणे किंबहुना शाळा स्वच्छ व नीटनेटकी ठेवणे अत्यंत महत्वाची बाब आहे. या दृष्टीने विचार करत आमचे विश्वस्त श्री देबराज भांजा सर व शाळेचे मुख्याध्यापक श्री अंकुश लांघी सर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे स्वचतेच्या द्रुष्टीने एक परीक्षण करण्यात आले व त्या प्रमाणे लागणाऱ्या साहित्यांची एक यादी बनवण्यात आली

उदा.

१) फरशी पुसण्यासाठी उत्तम प्रतीचे मॉप.

२) शाळेचे सौचालाय स्वच्छ करण्यासाठी ब्लिचिंग पावडर.

३) फिनाईल

४) हार्पिक

५) पँडल डस्टबिन

६) उत्तम प्रतीचे झाडू

७) सफाई करण्यासाठी हातमोजे इत्यादी.

आणि या **दि. २२ सप्टेंबर २०२३** रोजी या साहित्याचं शाळेमध्ये वाटप करण्यात आले.

## उपक्रम क्र. ७ शाळेतील महिला स्वच्छतागृहात नवीन दरवाजे लावणे.

शाळेमध्ये स्वच्छता जेव्हडी महत्वाची आहे तेव्हडीच सुरक्षितता ही महत्वाची आहे.
ज्या वेळी आम्ही स्वच्छतेच्या द्रुष्टीने शाळेचे परीक्षण करत होतो त्यावेळी असे निदर्शनास आले की शाळेतील जे विद्यार्थिनींसाठी चे स्वच्छतागृह आहेत. त्यातील बहुतांशी स्वछतागृहांचे दरवाजे हे जीर्ण झालेले आहेत. काही दरवाजे निखळलेले आहेत तर काही दरवाजे पाण्यामुळे खराब झालेले आहेत. याच्यावर उपाय म्हणून आम्ही सुताराला बोलावले त्याने पाहणी केल्यानंतर असे सांगितले की या दरवाज्यांची दुरुस्ती करण्यापेक्षा जर नवीन दरवाजे आपण बसवले तर ते जास्त उत्तम व टिकाऊ होईल जेणेकरुन आणखी ४ ते ५ वर्ष हे दरवाजे खूप चांगल्या प्रकारे टिकतील आणि कोणत्या हि प्रकारचा अनावश्यक खर्च करण्याची गरज पडणार नाही. या द्रुष्टीने विचार करत आमचे विश्वस्त श्री देबराज भांजा व शाळेचे मुख्याध्यापक श्री अंकुश लांघी सर यांनी सुताराला सांगून **दि. ३ ऑक्टोबर २०२३** रोजी शाळेतील महिला स्वच्छतागृहात नवीन दरवाजे बसवून घेतले.

पूर्वी







आता







## उपक्रम क्र. ८ किड्स प्ले झोन बनविणे.

शाळा दत्तक घेतल्या पासून जसे आम्ही वर नमूद केलेले सर्व उपक्रम योग्य रित्या पार पाडत आलो त्याचा आनंद आम्हाला व शाळेतील शिक्षकांना तर होताच पण आपल्या शाळेचे गटप्रमुख सौ अनघा पलांडे मॅडम यांनाही या गोष्टीचा खूप अभिमान होता. असेच एकदा संस्थेचे सर्व विश्वस्त आणि शाळेतील सर्व शिक्षक व गटप्रमुख सौ अनघा पलांडे मॅडम यांची शाळेसाठी आणखी काय करता येईल या साठी बैठक चालू असताना शाळेतील पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी आपण एखादा किड्स प्ले झोन बनवावा असा प्रस्ताव त्यांनी मांडला. विद्यार्थ्यांच्या हिताच्या द्रुष्टीने हा प्रस्ताव सर्वांना आवडला आणि सुरुवात झाली किड्स प्ले झोन या नवीन उपक्रमाची.
पुढे किड्स प्ले झोन साठी एका मोठ्या शैक्षणिक वर्गाची निवड करण्यात आली त्याच बरोबर त्या वर्गात विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक द्रुष्ट्या तसेच मनोरंजन द्रुष्ट्या कोणती खेळणी, कोणते टेबल खुर्ची, अश्या बऱ्याच काही उपयोगी गोष्टींची यादी बनवण्यात आली (यादी सोबत जोडलेली आहे) आणि त्या अनुशंगाने या सर्व गोष्टींची पूर्तता करण्यास सुरुवात झाली. याचप्राणे किड्स प्ले झोन यासाठी जो वर्ग निवडला त्या मध्ये **दि. ५ ऑक्टोबर २०२३** रोजी एक अतिशय उत्तम प्रतीचे पीव्हीसी फ़्लोरिंग बसवण्यात आले आणि आंम्हाला अपेक्षा आहे कि ऑक्टोबर महिन्याच्या शेवट पर्यंत हा किड्स प्ले झोन उपक्रम यशस्वी रित्या पूर्ण होईल.

